


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे      सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ । अंक १४१ । मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322



छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ रोजी असल्याने उत्सवासाठी भगवे झेंडे ,पताका तसेच विविध रंगातील आकारातील मूर्तीवर अखेरचा हात कारखान्यामध्ये दिला जात आहे ( फोटो - राजू खरपुडे .नगर)

## मनोविकृताने जन्मदात्रीला संपविले

**मृतदेहाशेजारी बसला गोट्या खेळत । सावेडीच्या नवलेनगरमधील हृदयद्रावक घटना**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुलमोहर रस्त्यारील नवलेनगरमध्ये एका मनोविकृत तरुणाने आपल्या जन्मदात्रीचा भिंतीवर आपटून व चाकूने निर्घृण खून केल्याची घटना घडली. बेबी गवारे असे मृत महिलेचे नाव असून, या प्रकरणी पोलिसांनी तिचा मनोविकृत मुलगा सुहास गवारे यास ताब्यात घेतले आहे. कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासातून पुढे आले आहे.

आज दुपारी दोनच्या सुमारास कौटुंबिक वादातून सुहास गवारे या मनोविकृत तरुणाने आपली जन्मदात्री आई बेबी गवारे यांना मारहाण केली तसेच भिंतीवर डोके आपटून व घरातील चाकूने वार करून निर्घृण खून केला.

दरम्यान, जन्मदात्रीला संपविल्यानंतर हा मनोविकृत आईच्या मृतदेहाशेजारी गोट्या खेळत बसला होता. शेजारच्यांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांना कळविण्यात आले. पोलीस घटनास्थळी आले असता हा मनोविकृत घराचे दरवाजे आतून बंद करून आईच्या मृतदेहाशेजारी गोट्या खेळत असल्याचे व पोलिसांना बघून चित्रविचित्र हातवारे करत असल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच या ठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी जमा झाली. या हृदयद्रावक घटनेबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी प्रयत्नांनी दरवाजा उघडून या संशयित मनोविकृतास ताब्यात घेतले.

## एमआयडीसीत कथित कामगार संघटनेचे पुढारी व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना आळा घाला

**आमी घटनेचे पोलीस अधीक्षकांना निवेदन । उद्योजकांमध्ये दहशत पसरविणाऱ्यांवर कारवाईचे पोलीस अधीक्षक घार्गे यांचे आश्वासन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** एमआयडीसीत कथित कामगार संघटनेचे पुढारी व काही अनोळखी गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना सोबत घेऊन कंपनीच्या आवारात अनधिकृत प्रवेश करत असल्याप्रकरणी सुयश मेटल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक व असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) संघटनेच्या सदस्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन दिले. तर औद्योगिक वसाहतीतील दहशत कायमस्वरूपी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, मा. उपाध्यक्ष ■ पान ४ वर

**माझी वसुंधरा ५.० अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेला**

## सलग तिसऱ्या वर्षी पुरस्कार

**। महाराष्ट्रातील ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अहिल्यानगर महानगरपालिका तिसऱ्या क्रमांकावर**
**। शहरासाठी केलेल्या उपाययोजनांचे चीज झाले : आयुक्त**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या माझी वसुंधरा ५.० अभियानांतर्गत घेतलेल्या स्पर्धेत अहिल्यानगर महानगरपालिकेला सलग तिसऱ्या वर्षी पहिल्या तीन क्रमांकामध्ये पुरस्कार मिळाला आहे. ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अहिल्यानगरला तृतीय पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. माझी वसुंधरा अभियानात विशेष मेहनत घेऊन केलेल्या उपाययोजना, त्याचबरोबर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कचरा मुक्त शहराला थ्री स्टार मानांकन यामुळे, तसेच नागरिकांच्या व महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे महानगरपालिका ही कामगिरी करू शकली, अशी भावना आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केली.

माझी वसुंधरा अभियानात गेली दोन वर्षे महानगरपालिकेला राज्यस्तरीय दुसरा क्रमांक मिळाला होता. यंदाही महानगरपालिकेने चांगली कामगिरी करत तिसरा क्रमांक मिळवला आहे. भूमी, वायू, अग्नी, जल, आकाश या घटकात शासनाच्या निर्देशानुसार उपाययोजना करण्यात आल्या. शहरात या विषयी विविध अभियान राबवून नागरिकांना सहभागी करून घेण्यात आले. महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, विशेषतः ■ पान ४ वर



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान विषयी उद्गाराच्या निषेधार्थ सकल हिंदु समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ हर्षवर्धन सपकाळ व टिपू सुलतान यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले.

**शासकीय कामात अडथळाप्रकरण**

## नजू पैलवान, रशीद दंडा, एजाज चीची यांच्यासह सात जणांची निर्दोष सुटका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक ७ श्री. तायडे यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात, शासकीय कामात अडथळा आणल्याचा आरोप असलेल्या नजू पैलवान, रशीद दंडा, एजाज चीची यांच्यासह एकूण सात जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. हा निकाल १६ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झाला.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

कोतवाली पोलीस स्टेशनकडून दाखल करण्यात आलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांकात, तोफखाना पोलीस स्टेशनमधील फरार आरोपी रशीद दंडा याला अटक करण्यासाठी कोतवाली पोलिसांची टीम गेली असता, उपस्थित आरोपींनी अटक प्रक्रियेत अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानुसार सात जणांवर शासकीय कामात अडथळा आणण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**अभियोग पक्षाची बाजू**

या खटल्यात अभियोग पक्षातर्फे एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. विशेष म्हणजे सर्व चारही साक्षीदार पोलीस कर्मचारी होते. मात्र साक्षीदरम्यान कोणताही ठोस पुरावा, स्पष्ट कृती वा आरोपींचा थेट सहभाग सिद्ध न झाल्याने, साक्षींची मांडणी न्यायालयास पटली नाही.

न्यायालयाचा निष्कर्ष सर्व साक्षीदार पोलीस असूनही कथनातील विसंगती, ठोस पुराव्यांचा अभाव, आरोपींचा सहभाग सिद्ध न होणे या कारणांवर आधारित न्यायालयाने सर्व आरोपी निर्दोष असल्याचे घोषित केले.

जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक ७ श्री. तायडे यांनी निकाल देताना म्हटले की: ''अभियोग पक्ष आरोपींचा दोष निर्णायकपणे सिद्ध करण्यात अपयशी ठरला असून, शंका आरोपींच्या फायद्याची.'' बचाव पक्षाची भूमिका आरोपींच्या वतीने ॲड. समीर पटेल आणि ॲड. सलमान जहागीरदार यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. या दोन्ही वकिलांना प्रकरणात महाजन शेख मिर्झा यांनी सहकार्य केले.

बचाव पक्षाने सादर केलेल्या निवेदनात, ''पोलीस तक्रारीतून निर्माण झालेला गैरसमज, तथ्यांचा अभाव आणि चुकीची जोडणी'' हे मुद्दे भक्कमपणे मांडले. न्यायालयाने त्याची दखल घेत आरोपींना मुक्त केले.

## पालकांनी आपल्या पाल्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे गरजेचे – उपमहापौर धनंजय जाधव

**बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम स्कुलमध्ये स्नेहसंमेलन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प. पु. माताजी श्री निर्मला देवी प्रणित विश्व निर्मल फौंडेशन संचलित बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम प्री प्रायमरी स्कुल च्या स्नेह संमेलन प्रसंगी अहिल्यानगर महानगरपालिके चे नवनिर्वाचित उपमहापौर धनंजय जाधव अध्यक्षस्थानी होते या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक कुमारभाऊ वाकळे,नगरसेवक नवनाथ कातोरे, नगरसेविका सौ. आशाताई कातोरे,नगरसेविका सौ. सुनिता भिंगारदिवे, मा. नगरसेवक मदनशेठ आडाव, मा.नगरसेविका सौ.विनाताई बोज्जा, संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा, सचिव डॉ. लक्ष्मीकांत पारगावकर, संचालक संदीप ठोंबरे, खजिनदार संदीप गांगर्डे, संचालक सौ. राणी ठोंबरे, संचालक सौ. स्वाती पारगावकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचे हस्ते प. पु. माताजी श्री निर्मला देवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले.

स्नेह संमेलन मध्ये विदयार्थ्यांकडून अनेक देश भक्तीपीर गीतावर नृत्य बसविण्यात आले. तसेच धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाटिका



प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमामध्ये यावर्षीचे बेस्ट स्टुडन्ट अवॉर्ड आराध्या इथापे, शिवण्या गोरे, रितिका कदम, गार्गी येणारे, वेदिका जेजुरकर, ओवी यादव,आदिती पाटील, हर्षवर्धन कदम, शिवराज लगड, विराज कलसाईट, हर्षवर्धन येवले, श्रेयांश गांगर्डे, श्रेयश खेडकर, अंश आढाव यांना देण्यात आले. या स्नेहसंमेलनात विदयार्थ्यांच्या पालक महिलांनी सुद्धा सहभागी होऊन नृत्य सादर केले तर शेवटी शाळेतील शिक्षकांनीही नृत्य सादर करून सर्व पालक व श्रोत्यांची मने जिंकलित.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी केले त्या वेळी त्यानी शाळेबाबत माहिती दिली व शाळेसाठी संस्थेने स्वमालकीची जागा घेतली असून लवकरच त्या ठिकाणी बांधकाम करून शाळा आपल्या स्वमालकीच्या जागेत जाईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अर्चना भाटे मॅडम आणि सौ. दिपाली हजरे मॅडम यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरच्या नवनिर्वाचित महापौर यांचा स्नेहबंधतर्फे सत्कार



अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या नवनिर्वाचित महापौर सौ. ज्योतीताई अमोल गाडे यांचा स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी महापौर सौ. गाडे यांना शाल व वृक्ष देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापौरांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर अधिक स्वच्छ, हरित व प्रगत शहर घडावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणाच्या माध्यमातून हा सत्कार अधिक अर्थपूर्ण ठरला. महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकाभिमुख उपक्रम, विकासकामे व सामाजिक सलोखा वृद्धिंगत होण्यासाठी स्नेहबंध सोशल फौंडेशन सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही डॉ. उद्धव शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### मुंबईत सौ. कासाबाई कोल्हे यांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार



पैठण- आडुळ पंचायत समिती गणातील नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या सौ. कासाबाई भाऊसाहेब कोल्हे यांचा मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तालुक्यात सर्वाधिक मताधिक्याने विजय संपादन केल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.मुंबईतील या कार्यक्रमास छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदीपान पाटील भुमरे, आमदार विलास बापू नगराध्यक्ष भुषण कावसानकर, महिला आघाडी प्रमुख ज्योतीताई पठाडे, माजी सरपंच अभिजित तवार, सरपंच संभाजी तवार, उपसरपंच भुषण तवार यांच्यासह तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सौ. कोल्हे यांचे अभिनंदन करत जनतेने दाखविलेल्या विश्वासास पात्र ठरत विकासकामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. तालुक्यात सर्वाधिक लिडने मिळालेला विजय हा जनतेच्या पाठिंब्याचे द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले. सौ. कासाबाई कोल्हे यांनी मतदारांचे आभार मानत गणातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या सत्कारामुळे आडुळ परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### अहिल्यानगर येथे १८ फेब्रुवारी रोजी पेन्शन अदालत

अहिल्यानगर- अहिल्यानगर कोषागार कार्यालय आणि महालेखापाल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त वेतनधारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी ''पेन्शन अदालत'' आयोजित करण्यात आली आहे. ही पेन्शन अदालत सकाळी १०.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद येथे पार पडणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन संदर्भातील विविध प्रश्न, तांत्रिक अडचणी, त्रुटीमुळे प्रलंबित असलेली प्रकरणे तसेच वेतननिर्धारणातील शंका यांचे मार्गदर्शन या बैठकीत करण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष संवाद साधून समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.या पेन्शन अदालतमध्ये विविध राष्ट्रीयकृत बँकांचे व्यवस्थापक देखील उपस्थित राहणार असून बँक व्यवहार, पेन्शन जमा होण्यातील अडचणी, जीवन प्रमाणपत्र, खाते संबंधित त्रुटी आदी विषयांवर मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

### जातीय द्वोषातून शेजारच्या वकीलाकडून खोटे गुन्हे

अहिल्यानगर- आम्ही मागासवर्गीय 'महार' समाजातील असल्यामुळेच आमच्यावर जाणीवपूर्वक जातीय द्वोषातून खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत,'' असा गंभीर आरोप शहरात वास्तव्यास असलेले व मुंबई येथे कार्यरत असलेले डेप्युटी जीएसटी कमिश्नर विवेक प्रभाकर घोडके यांनी पत्रकार परिषदेत केला.ब घोडके यांनी सांगितले की, ते पत्नी व दोन मुलीसह कादंबरी नगरी ३, इस्कॉन मंदिराजवळ, गावडे मळा, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे मागील १६ वर्षांपासून वास्तव्यास आहेत. काही वर्षांपूर्वी शेजारी राहायला आलेल्या एका वकील कुटुंबाकडून त्यांना सातत्याने त्रास दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.महानगरपालिकेची विधिवत परवानगी घेऊन घराचे बांधकाम सुरू केले असताना शेजारी राहत असलेल्या वकीलाने अडथळे निर्माण केले. कामगारांना शिवीगाळ व मारहाण करण्यात आली.

---

#### अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

# अहिल्यानगर उपनगर शाखेची पंचवार्षिक सभा उत्साहात

**प्रसाद बेडेकरांची अध्यक्ष म्हणून फेरनिवड । १०२ वे नाट्य संमेलन नगरमध्ये व्हावे अशी मागणी**



प्रसाद बेडेकर | प्रशांत जठार | पी.डी. कुलकर्णी | सुदर्शन कुलकर्णी | मधुरा झावरे | गणेश सपकाळ | जालिंदर शिंदे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहिल्यानगर उपनगर शाखेची पंचवार्षिक सभा उत्साहपूर्ण व सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाली. या सभेस मध्यवर्ती कार्यालयाकडून निरीक्षक म्हणून नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके आणि नियामक मंडळ सदस्य क्षितिज झावरे उपस्थित होते. सभेत २०२४ ते २०२५ या कालावधीत शाखेतर्फे राबविण्यात आलेल्या विविध नाट्य, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आगामी कार्ययोजना आणि संस्थेच्या बळकटीकरणासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

सभेची सुरुवात मागील कार्यकाळातील कामगिरीच्या अहवालाने झाली. या कालावधीत राज्यस्तरीय स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव, व्यावसायिक नाटकांचे प्रयोग, संगीत कार्यक्रम तसेच ऐतिहासिक ठरलेले विभागीय नाट्यसंमेलन यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्याची नोंद घेण्यात आली. नाट्यचळवळ अधिक व्यापक करण्यासाठी प्रेक्षकांपर्यंत दर्जेदार नाट्यप्रयोग पोहोचविण्याचा प्रयत्न परिषदेने सातत्याने केल्याचे नमूद करण्यात आले.

सभेत मांडण्यात आलेल्या विविध ठरावांपैकी प्रमुख ठराव म्हणजे आगामी १०२ वे नाट्य संमेलन अहिल्यानगर येथे आयोजित करण्यासाठी मध्यवर्ती स्तरावर अधिकृत मागणी करणे हा होता. नगर शहराची सांस्कृतिक परंपरा आणि नाट्य क्षेत्रातील योगदान लक्षात घेता हे संमेलन येथे आयोजित व्हावे, अशी एकमुखी भावना सदस्यांनी व्यक्त केली.

तसेच स्वर्गीय उर्मिलाताई लोटके यांच्या स्मरणार्थ नाट्य क्षेत्रातील नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम आणि स्मरणार्थ कार्यक्रम आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

या प्रसंगी मध्यवर्ती निरीक्षक सतीश लोटके यांनी आपल्या मनोगतात परिषदेचे कार्य अतिशय स्तुत्य असल्याचे नमूद केले. नाट्यप्रेमी प्रेक्षकांची संख्या वाढविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदेच्या कार्याविषयी व्यापक जनजागृती करणे, पारंपरिक कार्यक्रमांसोबतच नाविन्यपूर्ण आणि वेगळे उपक्रम राबविणे, तसेच उपनगर व शहर शाखांनी एकत्रितपणे संयुक्त कार्यक्रमांचे नियोजन करणे यावर त्यांनी भर दिला.

मध्यवर्ती निरीक्षक क्षितिज झावरे यांनी आपल्या भाषणात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही शंभर वर्षांची गौरवशाली परंपरा असलेली संस्था असल्याचे सांगून, संस्थेची पारदर्शकता आणि कार्यपद्धती जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. त्यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

सभेत पुढील नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली :

अध्यक्ष : प्रसाद बेडेकर
प्रमुख कार्यवाह : जालिंदर शिंदे
कोषाध्यक्ष : मधुरा झावरे
सह कोषाध्यक्ष : शिरीष जोशी
सह कार्यवाहक : गणेश सपकाळ, तुषार देशमुख, आणि अभय गोले,
कार्याध्यक्ष : पी. डी. कुलकर्णी
उपाध्यक्ष (प्रशासन) : प्रशांत जठार
उपाध्यक्ष (उपक्रम) : सुदर्शन कुलकर्णी
प्रमुख सल्लागार :- क्षितिज झावरे
कार्यकारिणी सदस्य :
डॉ. मयुर तिरमखे, टिना इंगळे, ईश्वर बोरा, चैत्राली जावळे, देवाशीष शेडगे, विद्या जोशी, आरती अकोलकर, अमित खताळ, मधुर बागायत. सभेचा समारोप प्रमुख कार्यवाहक जालिंदर शिंदे यांनी आभार प्रदर्शनाने केला.

---

## महानगरपालिकेच्या वतीने 'हिंद दी चादर' गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आरोग्य पंधरवाड्याचे आयोजन

**नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा : आयुक्त यशवंत डांगे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ''हिंद दी चादर'' गुरु तेग बहादूर साहीबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शहरात विशेष आरोग्य पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत १७ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शहराच्या विविध भागांत आरोग्य केंद्रांवर मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

या पंधरवाड्यांतर्गत शहरातील विविध नागरी आरोग्य केंद्रे, आयुष्मान भारत आरोग्य केंद्र आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे सकाळी १० ते २ या वेळेत शिबिरे होतील. यामध्ये १७ फेब्रुवारी रोजी केडगाव, १८ फेब्रुवारी रोजी जिजामाता, २० फेब्रुवारी रोजी महात्मा फुले, २१ फेब्रुवारी रोजी तोफखाना, २३ फेब्रुवारी रोजी सावेडी, २४ फेब्रुवारी रोजी नागापूर आरोग्य केंद्र येथे शिबिर होईल. २२ फेब्रुवारी रोजी भाईसिंगजी दया गुरुद्वारा, गोविंदपुरा येथे महानगरपालिका आणि जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत विशेष भव्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तर, २५ फेब्रुवारी रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना नालेगाव व श्रमिकनगर येथेही शिबिर होणार आहे.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब (), मधुमेह (शुगर) आणि कॅन्सरची प्राथमिक तपासणी, क्षयरोग () निर्मूलन अभियानांतर्गत हाय रिस्क रुग्णांची तपासणी व आवश्यकतेनुसार मोफत एक्स-रे सुविधा, पात्र लाभार्थ्यांसाठी आयुष्मान कार्ड आणि आभा कार्ड ( ) काढून देण्याची सुविधा, विविध प्रकारच्या लॅब टेस्ट आणि इतर वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

---

#### पारनेर तालुक्यात शिवसेनेची नवी धुरा

## अरुणराव ठाणगे तालुकाप्रमुख कोमल भंडारी महिला आघाडी प्रमुख

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गेल्या दोन महिन्यापूर्वी सुजित झावरे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पारनेर येथे मोठे शक्ती प्रदर्शन करत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करत धनुष्यबाण हातात घेतला आणि त्यानंतर तालुक्याच्या राजकारणात मोठा बदल पाहिला मिळाला.

निघोज येथे रविवारी झालेल्या पक्षीय कार्यक्रमात जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारनेर तालुका शिवसेना प्रमुख म्हणून पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व ज्येष्ठ नेते अरुणराव ठाणगे यांची निवड करण्यात आली तसेच शिवसेना उद्धव ठाकरे पक्षातून शिवसेना शिंदे गटात नुकताच जाहीर प्रवेश केलेल्या अळकुटी गावचा सरपंच कोमल भंडारी यांची शिवसेना पक्षाच्या महिला आघाडीच्या पारनेर तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली.

यावेळी निवडीचे पत्र त्यांना आमदार सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख नितीन शेळके, खंडू भुकन साहेब, योगेश रोकडे, कैलास कोठावळे, अमोल साळवे, धर्म रक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष वराळ, मुन्ना शिंदे, विलास शेंडकर, शहाजी कवडे, बाळासाहेब रेपाळे, अमोल साळवे, रविंद्र पाडळकर, मनोज मुंगसे, संकेत झावरे, मुन्ना वैद्य, सोनू मंचरे, अजिंक्यदादा दरेकर, पंकज कारखिले, अशोक मेसे, अमोल रासकर, सुरेश खोसे, भास्कर कवाद, गजानन सोमवंशी, उद्योजक गणेश बोंबले, अनिकेत एरंडे, सुभाष करंजुले, विठ्ठल झावरे, संग्राम झावरे, संकेत झावरे तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी, मान्यवर मंडळी उपस्थित होते.

---

## सामुदायिक विवाहाची संकल्पना आज समाजात रुजविणे गरजेचे - महापौर

**कल्याण रोडवरील बालाजी, विठ्ठल-रुखमाई देवस्थानच्या बालाजी उत्सवात सामुदायिक विवाह संपन्न**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आज विवाह जुळवणे आणि ते पार पाडणे ही मोठी जिकरीची गोष्ट झाली आहे. मोठेपणा मिरविण्यासाठी अनेकजण अनावश्यक खर्च विवाह सोहळ्यात करत असतात. हौसेला मोल नसते. परंतु आज समाज वेगळ्या परिस्थितीतून जात आहे, अशा परिस्थितीत लग्नातील अनवश्यक खर्चास फाटा देत आज बालाजी उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या सामुदायिक विवाह सोहळा हा आदर्शवत असाच आहे. गेल्या १२ वर्षांपासून नळकांडे बंधू धार्मिक कार्याबरोबर सामाजिक प्रश्नांना प्राधान्य देत आहेत. वधू-वरांच्या पालकांचा खर्चाची बचत होऊन सामुदायिक विवाहाची संकल्पना आज समाजात रुजविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापौर जोतीताई गाडे यांनी केले.

कल्याण रोडवरील बालाजी, विठ्ठल-रुखमाई देवस्थानच्यावतीने बालाजी उत्सवात सामुदायिक विवाह संपन्न झाले. याप्रसंगी आयोजक राम नळकांडे, माजी नगरसेवक शाम नळकांडे आदि सह सर्व परिवार उपस्थित होते.

पुढे बोलताना महापौर गाडे म्हणाल्या कि सर्वधर्मिय सामुदायिक विवाह ही काळाची गरज आहे. बालाजी महोत्सवातील धार्मिक कार्यक्रमाबरोबरच असा सामुदायिक विवाह सोहळ्याचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. अशा उपक्रमामुळे समाजाला दिशा मिळणार आहे. नळकांडे परिवाराचा यातील पुढाकार हा कौतुकास्पद असाच आहे.

याप्रसंगी संभाजी कदम, भगवान फुलसौंदर,संजय शेंडगे,गणेश भोसले ,बाळासाहेब बोराटे,संदीप दातरंगे यांनीही बालजी महोत्सवानिमित्त सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी नगरसेवक शाम नळकांडे म्हणाले, दरवर्षी बालाजी महोत्सव हा विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमातून साजरा होत असतो. यात अहिल्यानगरसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. गेल्या १२ वर्षांपासून या उत्सवात सर्वधर्मियांचा सामुदायिक विवाह सोहळ्यात ४६ विवाह लावण्यात येऊन वधू-वरांच्या पालकांना दिलासा देण्याचे काम करत आहोत.तसेच हा जो उत्सव पार पाडण्यासाठी आमच्या सर्व मित्र परिवार यांनी जे सहकार्य केले ते खरोखरच कोतुकस्पद असल्याचे त्यांनी सांगितले तसेच धार्मिक कार्यातून सामाजिक उन्नतीकडे असा हा आमचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.या सामुदायिक विवाहाच्या अगोदर तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या विवाह सोहळ्याप्रसंगी संजय शेंडगे, संभाजी कदम, भगवान फुलसोंदर ,बाळासाहेब बोराटे,सुरेखा कदम ,गणेश भोसले ,संजय चोपडा ,अमोल येवले , संतोष गेनपा ,गणेश कवडे ,सुरेश तिवारी ,दत्ता कावरे ,संदीप दातरंगे ,महेश लोंढे ,दगडू मामा पवार ,नवनाथ कातोरे आदिंनी उपस्थित राहून वधू-वरांना आशिर्वाद दिले. बालाजी सोसायटीचे अध्यक्ष राम नळकांडे यांनी प्रास्तविकात म्हणाले कि दरवर्षीप्रमाणे यंदाच्या बालाजी उत्सवांतर्गत धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम आयोजित केले होते.

---

#### चनकवाडी बंधाऱ्यातून गोदावरीत विसर्ग

## जलदगतीने गोदावरी वाळवंट स्वच्छ करणार : मुख्याधिकारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** नाथषष्ठी यात्रेनिमित्त पैठण येथे येणाऱ्या वारकऱ्यांच्या पारंपरिक वास्तव्याचे ठिकाण असलेल्या गोदावरी नदीपात्रातील वाळवंट परिसर स्वच्छ करण्यासाठी चनकवाडी येथील बंधाऱ्यात साठवलेले पाणी गोदावरी नदीत सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. शनिवारी (दि. १४) पाटबंधारे विभागाने बंधाऱ्याचे दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग केला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही ९ ते १२ मार्चदरम्यान श्रीसंत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी यात्रेला मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत. यात्रेदरम्यान वारकऱ्यांचे पारंपरिक वास्तव्य गोदावरी नदीपात्रातील वाळवंट भागात होत असल्याने तो परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने नियोजन केले आहे. नगरपरिषद नगराध्यक्ष विद्या भूसण कावसानकर व मुख्याधिकारी डॉ. पल्लवी आंभोरे यांच्या पुढाकाराने पाटबंधारे विभागाकडे पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत संत, उपअभियंता मंगेश पेलार, आवारसाहेब तुपे, अनिल वाघ, प्रमोद गायकवाड आदी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चनकवाडी बंधाऱ्याचे दरवाजे उघडण्यात आले.

बंधाऱ्यातील पाण्याच्या विसर्गामुळे गोदावरी नदीपात्रातील साचलेली गाळ-माती वाहून जाण्यास मदत होणार असून वाळवंट परिसर जलदगतीने स्वच्छ होईल, अशी माहिती मुख्याधिकारी डॉ. पल्लव ी आंभोरे यांनी दिली. तसेच नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागामार्फतही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रकाशयोजना व सुरक्षेचीही तयारी सुरू असून भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

---

## ग्रंथदिंडीच्या जल्लोषात 'कुसुमाग्रज वाचन अभियान'चा शुभारंभ; डोंगरगण शाळेत वाचन संस्कृतीची नवी पहाट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण येथे जिल्हा परिषद अहिल्यानगर चे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भंडारी यांच्या प्रेरणेतून व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनातून 'कुसुमाग्रज वाचन अभियानाची उत्साहपूर्ण सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या भव्य ग्रंथदिंडीने झाली. हातात विविध साहित्यिकांच्या ग्रंथांच्या प्रती, तसेच वाचनाचे महत्त्व सांगणारे सुविचारांचे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली. ''वाचाल तर वाचाल'', ''मोबाईल कमी, पुस्तक जास्त'' अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात ययाती, विशाखा, नटसम्राट, शेतकऱ्याचे आसूड, फकिरा तसेच भारताच्या संविधानाची प्रतिकृती होती. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, कुसुमाग्रज आणि अण्णाभाऊ साठे यांच्या वेशभूषेत साकारलेली रूपे विशेष आकर्षण ठरली.

यानंतर शाळेत बाल वाचनालय उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य सर्जेराव मते, उपसरपंच संतोष पटारे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा कोमल चांदणे, उपाध्यक्ष रवींद्र कदम, खेत्री मॅडम तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कणा, स्वतंत्र देवतेची विनवणी, राणीची बाग, आकाशातला हत्ती तसेच संदीप खरे यांच्या ''मी पप्पांचा ढापून फोन'' या कवितांचे सादरीकरण करून वातावरण भारावून टाकले.

मान्यवरांनी मनोगतात सांगितले की, मोबाईलच्या वाढत्या आकर्षणामुळे कमी होत चाललेली वाचनाची सवय पुन्हा दृढ करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरेल. दररोज शाळेत ठराविक वेळी 'वाचन घंटा' वाजवून सर्व विद्यार्थी त्यांच्या वयानुरूप पुस्तकांचे पाठ्यपुस्तकांसह अवांतर वाचन करतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांनी पुस्तक प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांसमवेत वाचनाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे यांनी केले, तर आभार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांनी मानले.

डोंगरगण शाळेच्या या अभिनव उपक्रमामुळे गावात वाचन संस्कृतीची नवी ज्योत प्रज्वलित झाली असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सर्जेपूरा मधील राधाकृष्ण मंदिरात महाशिवरात्री साजरी



अहिल्यानगर- सर्जेपूरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधाकृष्ण मंदिरात महाशिवरात्री भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. महादेवाच्या जयघोष करत शीख, पंजाबी समाजातील भाविकांनी दर्शनासाठी हजेरी लावली होती. सकाळी मंदिरातील शिवलिंगाचा अभिषेक करुन विधीवत पूजा करण्यात आली. ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वस्त व भाविकांच्या हस्ते महादेवाची आरती पार पडली. यावेळी भाविक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. भक्तीमय वातावरणात भजन मंडळीच्या वतीने भजन-कीर्तनाचा कार्यक्रम देखील रंगला होता. हर हर महादेवाच्या जय जयकाराने मंदिर परिसर दुमदुमून गेले. शाबुदाणा खिचडी व थंडाई प्रसादाचे वाटप करुन या धार्मिक सोहळ्याची सांगता झाली. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे सर्व विश्वस्त व समाजातील युवकांनी परिश्रम घेतले.

### शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी शिव पाणंद चळवळीची राष्ट्रीय झेप



अहिल्यानगर- महाराष्ट्राच्या मातीतून उगम पावलेली शिव पाणंद शेतरस्ता चळवळ आता राज्याच्या सीमा ओलांडून राष्ट्रीय स्तरावर झेप घेत आहे. शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी हा केवळ घोषवाक्य न राहता ग्रामीण भारताच्या सन्मानाचा आणि स्वाभिमानाचा संकल्प बनला आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी देशभरातील शेतकऱ्यांना दर्जेदार शेतरस्ते मिळाले पाहिजेत, अशी ठाम भूमिका मांडत लवकरच दिल्ली येथे राष्ट्रीय परिषद आयोजित करण्याचे संकेत दिले आहेत. दरम्यान, कन्याकुमारी ते काश्मीर अशी सुरू असलेली किसान जागृती यात्रा आज रांजणगाव गणपती मंदिर येथे दाखल झाली असून यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. जगजीत सिंह डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली ही यात्रा एमएसपीला कायदेशीर हमी, कर्जमाफी, एफआरपी वाढ, पीक विमा सुधारणा यांसारख्या प्रमुख मागण्यांसह शेतरस्त्यांच्या प्रश्नालाही राष्ट्रीय न्याय मिळावा, ही ठाम भूमिका देशभर पोहोचवत आहे.

### महिला दिनानिमित्त राघेय महिला गृह उद्योगतर्फे 'आनंद नगरी खरेदी महोत्सव'

अहिल्यानगर - महिलांच्या घरगुती व लघुउद्योगातून तयार होणाऱ्या वस्तूंना थेट बाजारपेठ मिळावी, या उद्देशाने राघेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधत भव्य 'आनंद नगरी खरेदी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव शनिवार २८ फेब्रुवारी व रविवार १ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जैन स्थानक, शिवगंगा टॉवरजवळ, सारसनगर, अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे. या खरेदी महोत्सवात महिलांच्या घरगुती उद्योगांमधून तयार होणाऱ्या कपडे, ज्वेलरी, खाद्यपदार्थ, हस्तकला साहित्य, ब्युटी प्रॉडक्ट्स आदींचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून ग्राहकांसाठी गेम स्टॉल्स व मोफत लकी ड्रॉ ही विशेष आकर्षणे असणार आहेत. ''ऑनलाइन नाही, ऑफलाइन खरेदी करा आणि स्थानिक व्यावसायिकांना प्रोत्साहन द्या'' असा संदेश या महोत्सवाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. या उपक्रमास रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी यांचे सहकार्य लाभले असून सौ. प्रतिभा धुत यांचे प्रमुख प्रायोजकत्व मिळाले आहे. गृह उद्योगातून बनवलेल्या वस्तूंना थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करता यावे, यासाठी सौ. उज्वला मालू व सौ. स्वाती नागोरी यांनी या खरेदी महोत्सवाचे आयोजन केले आहे.

## कला व सांस्कृतिक क्षेत्रातील छबुबाई नगरकर लोककलावंत पुरस्कार जाहीर

**गौरी रत्नपारखी, रोहिणी थोरात व सारिका अंधारे यांचा होणार सन्मान**
**ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात कला क्षेत्रातील योगदानाचा गौरव**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कला व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण कार्याबद्दल नाट्य अभिनेत्री गौरी रत्नपारखी, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात सांगवीकर तसेच लावणी नृत्यांगना सारिका चंद्रकांत अंधारे (नगरकर) यांना यंदाचा राज्यस्तरीय छबुबाई नगरकर लोककलावंत पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १९ फेब्रुवारी रोजी पाचवे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात कला व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या या तीन मान्यवर महिला कलाकारांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली.

अभिनेत्री गौरी रत्नपारखी यांनी अनेक मराठी नाटक व सिनेमामध्ये प्रमुख भूमिका साकारत रसिकांची मने जिंकली आहेत. मराठी व हिंदी मालिकांबरोबरच चित्रपट आणि वेब सिरीजमधूनही त्यांनी आपली अभिनयकला सिद्ध केली आहे. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त बाबू बँड बाजा या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेचे विशेष कौतुक झाले होते. साहित्य क्षेत्रातही त्यांची उल्लेखनीय कामगिरी आहे. त्यांच्या 'नसतोस घरी तू जेव्हा!' या पुस्तकाला २०२५ सालचा पु. ल. देशपांडे विनोदी साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. अभिनयासोबत लेखन क्षेत्रातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

अभिनेत्री व लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात सांगवीकर यांनी अहिल्यानगर आणि पुणे येथे आयोजित लावणी महोत्सवांमध्ये प्रभावी सादरीकरण करून अनेक पुरस्कार मिळवले आहेत. विविध मराठी चित्रपट व नाटकांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या ठसकेबाज शैलीमुळे आणि पारंपरिक लावणीला आधुनिकतेची जोड देणाऱ्या सादरीकरणामुळे त्या रसिकांच्या विशेष पसंतीस उतरल्या आहेत.

सारिका चंद्रकांत अंधारे (नगरकर) या उत्कृष्ट लावणी नृत्यांगना असून 'नखरेल नारी' फेम कलाकार म्हणून त्यांनी राज्यभरात आपली छाप पाडली आहे. विविध नाटकांमधील त्यांच्या अभिनयानेही प्रेक्षकांची दाद मिळवली आहे. लावणी परंपरेचे जतन आणि संवर्धन करतानाच नव्या पिढीपर्यंत ती पोहोचविण्याचे कार्य त्या सातत्याने करत आहेत.
ग्रामीण मराठी साहित्य संमेलन संयोजन समितीच्या वतीने कला क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाचा गौरव म्हणून राज्यस्तरीय छबुबाई नगरकर लोककलावंत पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर तिन्ही कलाकारांचे अभिनंदन होत आहे.

## आंतरशालेय विज्ञान उपकरण स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूलचे यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आंतरशालेय विज्ञान उपकरण स्पर्धा घेण्यात आली. या उपक्रमास विविध शाळांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवत नाविन्यपूर्ण वैज्ञानिक उपकरणे सादर करीत मोठे यश मिळवले.

कॅटेगरी १ (ग्रेड १ आणि २) मध्ये एअर अँड एअर प्रेशर या प्रकल्पासह प्रांशी कुमारी हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर इको फ्रेंडली आयडियाज या प्रकल्पासह ईशांक दिवटे याने द्वितीय क्रमांक मिळवला. कॅटेगरी २ मध्ये सिंपल मशीन या प्रकल्पासाठी नचिकेत झावर याने प्रथम क्रमांक मिळवला, तर इको फ्रेंडली स्कूल या प्रकल्पासाठी राज अनभुले याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

कॅटेगरी ३ (ग्रेड ६ ते ९) मध्ये आरण्य हॅच इन्क्युबेटर या नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी सौरिश अग्रवाल व शार्विल सोनवणे यांना द्वितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेत ध्रुवी लुंकड, सुखराज सिंग, वेदांत नरुला, असद खान पठाण, आरना कटारे, स्वामीराज पाटील व हर्ष सदवानी या विद्यार्थ्यांनीही विविध विज्ञानविषयक संकल्पनांवर आधारित प्रकल्प सादर करून उल्लेखनीय सहभाग नोंदवला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना एक हजार रुपये रोख पारितोषिक, तर द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना सातशे पन्नास रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

विद्यार्थ्यांना प्रकल्प सादरीकरणासाठी सारिका मॅडम, संजना मॅडम, सोनम मॅडम, चेतन सर, अजय के., प्राची मॅडम, अश्विनी मॅडम, आफरीन मॅडम, प्रीती मॅडम, शिंपी मॅडम, कीर्ती मॅडम व अनुश्री मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या संरक्षक मंगला मुथा, अध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त निर्मल मुथा, अमित मुथा, संचालक कर्नल आर. सी. राणा, आराधना राणा यांच्यासह सर्व ट्रस्टी व शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**१४ वे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन महाबळेश्वर करिता**

## बाळासाहेब देशमुख 'कथाकथन'साठी निमंत्रित



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन महाबळेश्वर येथे दिनांक २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न होत आहे. शेती साहित्य अभ्यासक माननीय ज्ञानदेव राऊत यांची संमेलनाध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. सदर साहित्य संमेलनामध्ये कथाकथन, कवी संमेलन , व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम, सन्मान असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. सदर संमेलन मध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रम साठी निवड झाल्याची माहिती अखिल भारतीय शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष ,सुप्रसिद्ध साहित्यिक गझलकार माननीय गंगाधर मुटे यांनी दिली आहे.

सदर संमेलनामध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख हे पापी पेट का सवाल है हा प्रयोग कथाकथन मध्ये सादर करणार आहेत. अवर्षणग्रस्त भागातील शेतकरी संकटात सापडतो. पोट भरण्यासाठी शहरात रसवंतीगृह चालविण्याचे काम करतो. संकटांची मालिका झेलत राहतो. पण अंगी असलेला कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा, माणुसकी सोडत नाही. यावरती भाष्य करणारी कथा.. सादर केली जाणार आहे. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ४५० प्रयोग शाळा, कॉलेज, सभागृह, ज्येष्ठ नागरिक संघ, इत्यादी ठिकाणी संपन्न झालेली असून, राज्यस्तरावरील महाराष्ट्राच्या विविध भागात नांदेड , देगलूर , कोल्हापूर, आळंदी, पुणे, बीड, नाशिक, सातारा येथे राज्यस्तरीय संमेलन मध्ये पंचवीस प्रयोग पूर्ण झालेले आहेत. त्यांच्या रंग माझा वेगळा हा कथासंग्रह नुकताच अखिल भारतीय साहित्य महामंडळ अध्यक्ष मिलिंद जोशी यांच्या शुभहस्ते प्रकाशित झाला. दुसरा कथासंग्रह माणसे अशी.. अन् तशीही... लवकरच प्रकाशित होत आहे. सदर संमेलन युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, स्वराज्य मुकुटमणी , प्रतापगड परिसर ,दाभे मोहन, महाबळेश्वर , जिल्हा सातारा येथे होत आहे.

## अमेरिकेतील शास्त्रज्ञ बाबासाहेब सोनवणे यांचा जेव्हा मायभूमीत सन्मान होतो

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आपल्या देशातील लोकांनी शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणावर भर दिला पाहिजे. आज शिक्षणामुळे आपल्याला जगाचे दरवाजे उघडले आहेत. जुन्या काळात माझ्या निरक्षर आईला शिक्षणाचे महत्त्व कळाले होते. त्यामुळे तिने मला गाव सोडून दुसरीकडे शिक्षणासाठी पाठविले आहे. त्यामुळेच मी आज जगभर संशोधनाचे काम करू शकलो. आज देशातील मुली शिकल्या तर ते घराचे नाव उज्ज्वल करतील, असे प्रतिपादन अमेरिकेचे संशोधक व शास्त्रज्ञ बाबासाहेब रखमाजी सोनवणे यांनी केले.

नगर तालुक्यातील नांदगांव-शिंगवेचे सुपुत्र असलेले बाबासाहेब रखमाजी सोनवणे हे गेल्या पन्नास वर्षांपासून अमेरिका व इतर देशात संशोधक व शास्त्रज्ञ म्हणून काम करतात. त्यांचा गणराज क्रीडा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजकुमार आघाव-पाटील व हनुमान तरुण मंडळाच्या वतीने गावात सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला अहमदनगर जिल्हा मराठा प्रसारक समाज संस्थेच्या दीपलक्ष्मी म्हसे, नांदगावचे सरपंच सखाराम सरक, उपसरपंच नाथा सरक, बाळासाहेब वरपे, माजी सरपंच विश्वास जाधव, व्यावसायिक चारुदत्त पवार, गणेश आघाव, अशोक काळे, ॲड. विक्रम आघाव, ॲड. वैभव आघाव, शामराव सोनवणे, सुधाकर जाधव, चंद्रकांत पुंड, म्हाळू महाराज डोईफोडो, बाळासाहेब सोनवणे, समीर सोनवणे, धनंजय सोनवणे, बाळासाहेब शंकपाळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

शास्त्रज्ञ बाबासाहेब सोनवणे यांनी आपला जीवनपट उलगडविला. त्यावेळच्या सामाजिक आणि गरिब परिस्थितीत शिक्षण घेऊन कसे पुण्यात आणि नंतर अमेरिकेत संशोधन घेण्यासाठी कसे गेले होतो. पुन्हा देशात येऊन देश, गावाची सेवा कशी करत आहोत, असा प्रवास सांगितले. ते म्हणाले, प्रत्येकाने मोठी महत्वाकांक्षा जीवनात ठेवावी, जीवनात चांगले कर्म करून मोठे झाले पाहिजे. समाजाचे देणे दिले पाहिजे. आता शिक्षणावर भर द्या, मुलीं खूप शिकवा. कारण मी जगात चाळीस देशात गेलो आहे. तिथे शिक्षणामुळे कशी प्रगती होते हे मी पाहिले आहे. त्यामुळे जाती-पातीचे भांडणे, भेदभावापेक्षा शिक्षण, आरोग्य, प्रगती सर्व महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक गाव हे स्वच्छ, सुंदर झाले पाहिजे. मुलांचे शिक्षण झाले आहे. आरोग्य चांगले पाहिजे, हे आवश्यक आहे. गावातील जुन्या आठवणी सांगताना बाबासाहेब सोनवणे यांना गहिवरून आले.

**राजकारण्यांना प्रश्न करा**

आपल्या गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी पुढे आले पाहिजे. गावात आलेल्या राजकारण्यांना प्रश्न विचारले पाहिजे. आमच्या गावांसाठी काय करणार आहात, असा प्रश्न ग्रामस्थांनी विचारला पाहिजे, असे सोनवणे म्हणाले.

## पोरगाव चौफुली येथे दोन दुकाने फोडणारा आरोपी जेरबंद; बिडकीन पोलिसांची कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पोरगाव चौफुली येथे दोन दुकाने फोडून सुमारे ५० हजार रुपयांची रोकड लंपास करणाऱ्या आरोपीला बिडकीन पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणातील आरोपीकडून चोरीतील काही रक्कम जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

दि. २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री दुकाने बंद करून घरी गेलेल्या रानू सुभाष काळे (वय ३९, रा. गव्हारे बस्ती, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्या पोरगाव चौफुली येथील दोन दुकानांचे शटर अज्ञात चोरट्याने कटरने कापून आत प्रवेश केला. दुकानातील गल्ल्यातील अंदाजे २२ हजार रुपये तसेच दुसऱ्या दुकानातील सुमारे २८ हजार ५०० रुपये अशी एकूण रक्कम चोरून नेण्यात आली. यावेळी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या वायर तोडून पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

या घटनेप्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७१/२०२६ अन्वये भा.दं.सं. कलम ३०५ (अ), ३११ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे नारायणपूर (ता. गंगापूर) परिसरात फिरत असलेल्या संशयितास पोलिसांनी दि. १२ फेब्रुवारी रोजी रात्री ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपी लखन कल्याण चंद्रशिव (रा. नारायणपूर) याने गुन्ह्याची कबुली दिली.

दि. १३ फेब्रुवारी रोजी आरोपीस न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने दि. १६ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. कोठडीत तपासादरम्यान आरोपीकडून चोरीतील ५ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह व उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिडकीन पोलीस ठाण्याच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

## नेप्ती विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप; विद्यार्थ्यांकडून विद्यालयास साऊंड सिस्टिमची भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री. स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी भव्य व उत्साही समारंभाचे आयोजन करण्यात आले. या निरोप समारंभास विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती रामदास फुले यांनी दिली . नेप्ती विद्यालय परिसरात आनंद, उत्साह आणि भावनिक वातावरण अनुभवायला मिळाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रवासातील अनुभव कथन करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करत यशाच्या शुभेच्छा दिल्या. ग्रामस्थांच्या भाषणांतूनही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याबाबत विश्वास व्यक्त करण्यात आला.

या वेळी दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने विद्यालयास साऊंड सिस्टिमची भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या या उपक्रमशील भेटीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. त्याचबरोबर सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजनही दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले होते.

समारंभास माजी सरपंच दिलीपराव होळकर, संस्थेचे उपाध्यक्ष अर्जुन होळकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, संतोष चहाळ, जमीर सय्यद, बाळासाहेब जपकर , मुख्याध्यापक महेश जाधव, राजेंद्र झावरे, नानासाहेब घोडके, बाबासाहेब भोर, गोरक्ष कोतकर, संतोष खरमाळे, शिवाजी जाधव, बाबूलाल सय्यद, राधा वामन, सविता कोरडे, श्रद्धा भांड यांच्यासह शिक्षकवृंद, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन शिस्तबद्ध व नेटके करण्यात आले होते. संपूर्ण समारंभात शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील आपुलकीचे नाते अधोरेखित झाले. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हा निरोप समारंभ आयुष्यभर स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत जलसंधारण विषयावर अखिल भारतीय सेमिनार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जलसंधारण ही केवळ सरकारी योजना नसून ती लोकसहभागातून उभी राहणारी चळवळ आहे. पाणी अडवापाणी जिरवा, कंटूर बंडिंग, शेततळे, वृक्षलागवड व भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केली, तर दुष्काळग्रस्त भागही समृद्ध होऊ शकतो, असे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कार विजेते व आदर्श गाव संकल्पनेचे प्रणेते पोपटराव पवार यांनी केले. लोकसहभाग, पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत शेती पद्धती आणि युवकांचे नेतृत्व या घटकांवर भर दिल्यास जलसंधारण कार्यक्रम दीर्घकालीन यशस्वी ठरतात, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात स्पष्ट केले.

अहिल्यानगर येथील विळद घाट मधील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी विद्यालयात द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर लोकल सेंटर यांच्या वतीने आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या सहकार्याने ''वॉटरशेड डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट प्रोग्राम्स : मॉनिटरिंग अँड इव्हॅल्युएशन'' या विषयावर अखिल भारतीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले. सेमिनारचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता नोंदणी प्रक्रियेसह झाली. डॉ.पी.एस.गायके आणि इंजि.ए.के.राजे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील तसेच डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे अॅड. वसंत कापरे यांनी जलव्यवस्थापनाच्या गरजेवर भाष्य करताना तंत्रज्ञानाधारित निरीक्षण व मूल्यमापन प्रणालींचे महत्त्व अधोरेखित केले. सन्माननीय अतिथी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही.के.खरचे, मॉडेल व्हिलेज प्रोग्राम चे संचालक पद्मश्री पोपटराव पवार, डॉ.व्ही.पी.सिंग (डिस्टिंग्विश्ड प्रोफेसर एमेरिटस, , अमेरिका) आदी उपस्थित होते. त्यांनी जलव्यवस्थापनातील संशोधन, लोकसहभाग आणि आंतरराष्ट्रीय अनुभव यावर मार्गदर्शन केले.

बीबीबीकार्यक्रमात इंजि.बी.पी.भगवत (अध्यक्ष, आयईआयएएलसी) यांनी आयईआय विषयी माहिती दिली.डॉ.ए.ए.अत्रे (संयोजक) यांनी सेमिनारच्या उद्दिष्टांची माहिती दिली. सूत्रसंचालनात डॉ.व्ही. पी.सिंग व डॉ.व्ही.के. खरचे यांची ओळख करून देण्यात आली त्यांनी देखील मार्गदर्शनपर भाषणे केली.

सेमिनारच्या आयोजनासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.राऊत, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर.नवथर, आयोजक सचिव डॉ.व्ही. एन.बाराई, सहसंयोजक डॉ.एस.बी.नंदगुडे, संयोजक डॉ.ए.ए.अत्रे, आईआय एएलसी चे मानद सचिव डॉ.डी.ए.विधाते, आयईआय एएलसी चे अध्यक्ष बी.पी.भगवत, इंजि.ए.के. राजे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ.व्ही. एन.बाराई यांनी आभार प्रदर्शन केले.राष्ट्रगीताने उद्घाटन समारंभाची सांगता झाली. त्यानंतर मुख्य सत्रात जलसंधारण विषयावर विशेष व्याख्याने पार पडली. देशभरातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जलसंधारण व शाश्वत विकासाच्या दृष्टीने हा सेमिनार मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# राजापूर येथे बिबट्याचा हल्ला; शेतकरी गंभीर जखमी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील राजापूर परिसरात गव्हाच्या शेताला पाणी देत असताना गणेश महादेव शेळके यांच्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात शेळके गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, आज पहाटे ढवळखोरी वस्ती परिसरातही बिबट्याने हल्ला केल्याची घटना समोर आली. या हल्ल्यात सुखदेव तुकाराम ढवळे यांचा पाळीव कुत्रा ठार झाला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. तसेच आधल्या दिवसी रायगव्हाण येथे माणिक पठारे यांच्या शेळी वरती दिवसा बिबट्याने हल्ला केला आहे. तसेच राजापूर येथील दादा कवाष्टे यांच्या येथील चार शेळ्या बिबट्याने फस्त केले आहेत. शेजारील गाव म्हसे येथील भांब वस्तीवर गेल्या आठवड्यात आणखी एक हल्ला झाला होता. मका पिकाला पाणी देत असताना काळू निकम यांच्यावर बिबट्याने झडप घातली होती. सुदैवाने तेंव्हा ही जीवितहानी टळली, मात्र ते जखमी झाले होते.



सलग घडणाऱ्या या घटनांमुळे शेतकरी व ग्रामस्थ भयभीत झाले असून वनविभागाने तात्काळ उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. परिसरात पिंजरा लावणे, रात्री गस्त वाढवणे आणि नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देणे आवश्यक असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे.घटनास्थळी वनरक्षक दिनेश भुमरे वनकर्मचारी हनुमंत रणदिवे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून घटनास्थळांचा पंचनामा केला आहे.



**अहिल्यानगर वार्ड क्रमांक चार सिटीझन बिल्डिंगजवळ, मुकुंदनगर भागात कचऱ्याचे साम्राज्य. महापालिकेने लवकरात लवकर साफसफाई करावी, अशी मागणी येथील रहिवाशांकडून होत आहे. (छाया – जाकीर शेख)**

# लंडन किड्सच्या शालेय विद्यार्थ्यांनी केली सहलीत धमाल

## पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष निसर्गरम्य परिसराची भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था संचलित लंडन किड्स प्री स्कूलची शैक्षणिक सहल आनंदबन येथे नेण्यात आली होती. एक दिवसीय सहलीत विद्यार्थ्यांनी निसर्गरम्य परिसराला भेट देवून सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

शाळेच्या प्राचार्या रुचिता जमदाडे म्हणाल्या की, चार ते सहा या वयोगटातील मुलांची सहल जामखेड रोडवरील आनंदबन या ठिकाणी घेऊन आलो असता, मोठ्या उत्साहात चिमुकल्यांचे ढोल ताशा वाजून स्वागत करण्यात आले. निसर्गमय परिसराची पहाणी करुन परिसरातील विविध गोष्टींची माहिती त्यांना देण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष निसर्गरम्य परिसराची भेट घडविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुलांनी रेन डान्स, वॉटर पार्क, बैलगाडा राईड, उंटावरून सवारी, रेल्वेची फेरी, मॅजिक शो, कटपुतली शो, बॉम्बे सर्कस, रस्सीखेच, उंचउडी अशा वेगवेगळ्या खेळ व उपक्रमांचा आनंद घेतला. सुंदर व प्रसन्न अशा वातावरणात मुलांचा आनंद द्विगुणीत झाला होता. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला.

यावेळी आनंदबनचे संचालक मंगेश बेरड व अक्षय भळगट यांनी सहलीचे स्वागत करुन सोयी-सुविधांची माहिती दिली. सहल यशस्वी करण्यासाठी लंडन किड्सच्या शिक्षिका कल्याणी शिंदे, सपना साबळे, जयश्री साठे,प्रतीक्षा शिंदे, स्वप्नाली ताजने,पूर्वा ढोरसकर, नक्षत्रा ढोरसकर,ज्ञानसाधना गुरुकुलचे संचालक प्रा. प्रसाद जमदाडे,गोंदके मावशी, वाळेकर मावशी यांनी परिश्रम घेतले.

### फुलसोदर मळा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

# सत्कर्म करुन भगवंतांचे नामस्मरण केले पाहिजे – सचिन जगताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर ही संताची भुमी आहे. ज्ञान आणि अध्यात्म या क्षेत्रात अग्रेसर आहे. आपल्याला उज्वल संस्कृतीचा वारसा आहे. विविधतेत एकता ही भारताची संस्कृती आहे. भारतीय संस्कृती पाश्चिमत्य देशाप्रमाणे आधारलेली नसून, त्यागावर आधारलेली आहे. त्यासाठी सर्वांनी अध्यात्माचा प्रचार व प्रसार करावा, त्यातुनच मनुष्याला शांती लाभणार आहे. मनुष्य जन्म हा आपला व आपल्या कुळाचा उद्धार करण्यासाठी मिळालेला आहे. या जन्मात आपण सत्कर्म करुन भगवंतांचे नामस्मरण केले पाहिजे, अखंड हरिनाम सप्ताह ही काळाची गरज बनली आहे त्यामाध्यमातून अध्यात्माचे विचार येणारे पिढीसाठी मौलिक असणार आहे असे प्रतिपादन आयुर्वेद सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी मांडले.

बुरुडगांव रोड येथील फुलसौंदर मळा येथे अखंड हरिनाम सप्ताहांतर्गत काल्याची हंडी हभप अमोल महाराज जाधव व आयुर्वेद सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते फोडण्यात आली. याप्रसंगी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, भिंगार बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, शितलताई संग्राम जगताप ,नगरसेविका सुनीता फुलसौंदर,अश्विनी लोंढे ,नगरसेवक गणेश कवडे ,दत्ता गाडळकर ,महेंद्र पडोळे ,अंबादास गारुडकर ,प्रा संजय गारुडकर ,राजेंद्र फुलसौंदर, गणेश फुल सौंदर, एल.के. आव्हाड, कारभारी सुपेकर, इंजि.अनिल साळूंके, संजय चाफे ,पुरुषोत्तम चाफे ,बाळासाहेब उबाळे आदि उपस्थित होते.



यावेळी बोलतांना हभप अमोल महाराज जाधव म्हणाले, आजच्या धावपळीच्या जीवनात मनुष्य एवढा व्यस्त झाला आहे की, आपण कुठे चाललो, काय करतो याचे भान राहिले नाही; त्यामुळे मनुष्यास शांती मिळत नाही. मनुष्यास जर समाधान, शांती पाहिजे असेल तर अध्यात्माशिवाय पर्याय नाही. गेल्या २७ वर्षांपासून प्रथम महापौर भगवान फुलसौंदर हे सप्ताहाच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना हा मोठा लाभ मिळवून देत आहे. त्यामुळेच सप्ताहातील किर्तने, प्रवचने ऐकण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

याप्रसंगी माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले, गेल्या २७ वर्षांपासून या सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असून, भाविकांचाही त्यास मोठा प्रतिसाद मिळत असतो. परिसरातील नागरिकांना आध्यात्मिकेतेचा लाभ व्हावा, यासाठी दरवर्षी महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार, प्रवचनकारांची अमृतवाणीचे पर्वणी देत आहोत. त्याचबरोबर मंडळाच्यावतीने सामाजिक उपक्रमही राबविले जात असतात. तसेच वर्षभर मंडळाच्यावतीने वृक्षारोपण, गुणवंतांचा सत्कार, योग शिबीरे अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

याप्रसंगी विष्णू फुलसौंदर म्हणाले, आज मनुष्य शिकून कितीही मोठा झाला तरी त्याला अनेक बाबतीत आध्यात्माचा आधार घ्यावा लागतो. प्रगती करावी परंतु आपली संस्कृती, इतिहास हा जपला पाहिजे. संत विचार हे आजही आपणास मार्गदर्शक ठरत आहे. त्यासाठीच गेल्या २७ वर्षांपासून हा ज्ञानयज्ञ सुरु असल्याचे सांगितले.

याप्रसंगी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. सप्ताह काळामध्ये संतसेवा केली . त्यांचा सन्मान करण्यात आला .यावेळी उकृष्ट रांगोळी काढल्याबद्दल आर्किटकट अपर्णा फुलसोंदर,अविनाश दळवी ,संतोष म्हस्के ,साधना रमेश कोठारी ,गौरव बोरुडे ,मुळचंद महाराज आदींचा सन्मान करण्यात आला .काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचा लाभ अनेक भाविकांनी घेतला. सप्ताह यशस्वीतेसाठी महाशिवरात्री उत्सव समिती व वैष्णव मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी भिंगार बँकेचे अध्यक्ष अनिलराव झोडगे ,उपाध्यक्ष किसनराव चोधरी ,शशिकांत महाजन ,नामदेव लंगोटे ,परेश लोखंडे ,अशोकराव कानडे ,पांडुरंग नन्नवरे ,मधुकर शिंदे ,वैभव जगताप विशाल पवार ,प्रकाश इवले ,अशोक बाबर आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंच महादेव दर्शन यात्रेने सुखावले शिवभक्त

## महाशिवरात्रीनिमित्त 'ट्रेकॅम्प-धरोहर'चा सलग दुसऱ्या वर्षी उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाशिवरात्री उत्सवात रात्रीचे महत्त्व विचारात घेऊन याही वर्षी ट्रेकॅम्प धरोहरने पंचमहादेव दर्शन यात्रेचे आयोजन केले होते. भल्या पहाटेच बेलेश्वर, शुक्लेश्वर, रामेश्वर, सिद्धेश्वर, घटेश्वर या शिवालयांत भक्तिभावात दर्शन झाल्याने यात्रेतील शिवभक्त कमालीचे सुखावून गेले.

ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून महाशिवरात्रीनिमित्त 'ट्रेकॅम्प-धरोहर'ने पंचमहादेव दर्शन यात्रेचे आयोजन केले होतो. महाशिवरात्रीच्या रात्री साडेबारा वाजता या दर्शन यात्रेचा प्रारंभ झाला. जवळपास ५० नगरकरांनी या यात्रेमध्ये सहभाग नोंदवला. एक वाजता सर्वजण नगर शहराजवळील बेलेश्वर महादेव मंदिराला पोहोचलो. एवढ्या रात्रीसुद्धा तेथ आरतीसाठी सर्व वयोगटातील भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. बेलेश्वर मंदिराचे व्यवस्थापन आणि महादेवाचा अर्धनारी नटेश्वर रूपात केलेला शृंगार खरोखरच मंत्रमुग्ध करणारा होता. आरतीनंतर प्रसाद म्हणून दुधाचे वाटप करण्यात आले. बेलेश्वर मंदिराचे दर्शन घेऊन सर्वजण भिंगारमधील शुक्लेश्वर महादेव मंदिरात पोहोचले. या ठिकाणी सर्वांचे दर्शन अवघ्या दहा मिनिटांत झाले. मंदिराच्या आवारातच मंदिर व्यवस्थापनाने गुळाच्या चहाची व्यवस्था केली होती. त्याचा आस्वाद घेऊन सर्वजण प्रवरासंगमकडे रवाना झाले.

प्रवरा संगमला आम्ही पहाटे साडेचार वाजता पोहोचलो. सर्वप्रथम पुरातन रामेश्वर मंदिराचे दर्शन आम्ही घेतले. पहाटेचे प्रसन्न वातावरण आणि सभामंडपात सजवलेली फुलांची मोठी रांगोळी येथील आकर्षण ठरत होते. रामेश्वर मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर सर्वजण कायगाव टोके येथील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी गेलो. सिद्धेश्वर मंदिरात पहाटे साडेपाच वाजता तेथे पोहोचलो. तेथील शिवलिंगावर प्रसन्न वातावरणात अभिषेक सुरू होता. या ठिकाणी सर्वांनी शिवस्तोत्रांचे पठण केले. काही काळ ओम नमःशिवाय या पंचाक्षरी मंत्राचे ध्यान केले. नंतर सर्वजण यात्रेतील शेवटच्या महादेव मंदिराचे दर्शन करण्यासाठी निघाले. सकाळी सात वाजता सर्व भाविक प्रवरा संगमावर श्री घटेश्वर महादेव मंदिरात पोहोचले. जुनी दगडी बांधकाम आणि विशाल शिवलिंग हे या मंदिराचे वैशिष्ट्य. पाचही मंदिरांचे अतिशय सुंदर दर्शन केल्यानंतर यात्रेत सहभागी सर्व भक्तांच्या चेहऱ्यावर समाधान स्पष्ट दिसत होते. अमृता बेडेकर यांनी एक छान भक्ती गीत सादर करून वातावरण अधिक भक्तिमय केले. करिष्मा कोठारी जोशी यांनी महादेवास नृत्य साधना अर्पण करून यात्रेची सांगता केली.

मेघा लाहोटी, मनीष कुलकर्णी, पिपिलीकेश्वर जाधव, राधिका लाहोटी यांनी सर्वांसाठी उपवासाची खिचडी आणि चहाची व्यवस्था केली.

(पान १ वरून)

## सलग तिसऱ्या वर्षी पुरस्कार

घनकचरा व्यवस्थापन विभाग व सफाई कामगारांनी घेतलेल्या मेहनतीमुळे महानगरपालिका ही कामगिरी करू शकली.

यापूर्वी अहिल्यानगर महानगरपालिकेने माजी वसुंधरा अभियान २.० मध्ये १.५० कोटी, ३.० मध्ये ६.०० कोटी व ४.० मध्ये ६.०० कोटी असे एकूण १३.५० कोटी इतके पारितोषिक प्राप्त केले आहे. शहरात विविध उद्याने हरित क्षेत्र, सौर ऊर्जेचे प्रकल्प, वृक्षारोपण तसेच वसुंधरेबाबत जनजागृती आदी उपक्रमांसाठी या निधीचा वापर करण्यात आला. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत दुसऱ्या तिमाहीमध्ये हरित शपथ घेण्यामध्ये अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात तीन ते दहा लक्ष लोकसंख्ये गटामध्ये प्रथम स्थानी होती. शहरातील १,४८,८९५ नागरिकांनी वैयक्तिक हरित शपथ घेतली. तर २००२ समुहांनी सामूहिक शपथ घेतली होती, असेही आयुक्त डांगे यांनी सांगितले. माझी वसुंधरा ६.० या अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेने तीन ते दहा लक्ष लोकसंख्ये गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून सर्व नागरिकांनी या अभियानामध्ये सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.
भूमी : या घटका अंतर्गत मनपाने वर्षभरात देशी प्रजातीच्या झाडांची लागवड केली. झाडाचे संगोपन करून त्यांना जगवले. कचऱ्याचे घरोघरी संकलन करून त्यावर प्रक्रिया करण्यात आली. सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी जनजागृती करण्यात आली होती. शहर हागणदारीमुक्त करून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ओडीएफ प्लसचा दर्जा कायम ठेवला.
वायू : या घटकात मनपाने अभियान कालावधीत हवेची गुणवत्ता तपासून त्यावर उपाययोजना केल्या. सण उत्सवात प्रदूषण टाळण्यासाठी जनजागृती करण्यात आली. सातत्याने स्वच्छता मोहिमा राबवतात शहरातील तयार होणारा बांधकाम, पाडकामाचा राडारोडा, कचरा उचलून विल्हेवाट लावण्यात आली.
जल : या घटकात मनपाने शहरातील पाण्याची पातळी राखण्यासाठी उपाय योजना केल्या. शहरातील पाणीसाठ्यांची साफसफाई केली. शहरातील सीना नदी पात्रात स्वच्छता करण्यात आली. सार्वजनिक इमारतीचे वाटर ऑडिट करण्यात आले. रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यास नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. गणपती विसर्जन दरम्यान जल प्रदूषण टाळण्यासाठी शहरात विविध ठिकाणी कृत्रिम कुंड तयार केले. इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांना त्याचे फायदे तोटे समजावून सांगून इको फ्रेंडली मूर्तींच्या विक्रीसाठी व नागरिकांनी खरेदी करावी यासाठी प्रयत्न केले.
अग्नी:याघटकातमनपानेशहरातएलईडीस्ट्रीटलाईटलावण्याचेकामकेले.शहरातविविधठिकाणी सोलार प्लांट लावले. खाजगी तत्त्वावर घरांवर सोलर बसवण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच सार्वजनिक इमारतीचे एनर्जी ऑडिट करून त्यावर उपाययोजना केल्या.
आकाश : या घटकात मनपाने नागरीकांमध्ये अभियानाची माहिती पोहोचण्यासाठी स्पर्धा, कार्यक्रम आयोजित करून जनजागृती केली. शहर हरित करण्यासाठी नागरिकांना व विद्यार्थ्यांना हरित शपथ दिली. शहरातील पर्यावरण प्रेमी व्यक्तींची पर्यावरण दूत म्हणून निवड करून विविध कार्यक्रमाद्वारे व त्यांच्या सहभागाने शहरात जनजागृती करत अभियानाचे उद्दिष्ट पूर्ण केले. या सर्व उपाययोजांमुळे महानगरपालिकेला या वर्षीही पुरस्कार मिळाला आहे.

## एमआयडीसीत कथित कामगार संघटनेचे पुढारी व

## गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना आळा घाला

संजय बंदिष्टी, दिलीप अकोलकर , सह सचिव सतीश गवळी, सचिव प्रफुल्ल पारख, सचिव सुमितलोढा, एमसीसीआयचे अरविंद पारगावकर, निखिल लोढा, दीपक नागरगोजे,मिलिंद दिनकर कुलकर्णी, मिलिंद एकनाथ कुलकर्णी, बालकृष्ण नरोडे, संदीप कोद्रे, राजेंद्र शुक्रे,रिसे साहेब ,प्रमोद भारुळे ,सुहास फुंदे , संदेश पिंपळकर , भूषण भणगे , सुभाष गुगळे , रोहकले साहेब ,दिनेश मुनोत, सुमित सोनवणे निनाद टिपुगडे, गोकुळ हांडे सचिन काकड इत्यादी सह बहुसंख्येने उद्योजक उपस्थित होते.अहिल्यानगर येथील औद्योगिक वसाहतीत अलीकडे वाढत चाललेल्या दहशतीच्या घटनांमुळे उद्योजक व कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. औद्योगिक वसाहत आकाराने लहान असली तरी तीच अहिल्यानगरच्या अर्थव्यवस्थेची मुख्य जीवनरेषा आहे. अनेक लघु उद्योग हे पूर्वाश्रमिच्या कामगारांनी एकत्र येऊन उभारलेले असल्याने उद्योगांवर होणारा कोणताही दबाव हा संपूर्ण आर्थिक व्यवस्थेला धक्का देणारा ठरत आहे.

निवेदनानुसार, कथित कामगार संघटनेचे पुढारी व काही अनोळखी गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना सोबत घेऊन कंपनीच्या आवारात अनधिकृत प्रवेश केला. या वेळी कंपनीचे कामकाज बंद पाडण्याचा मानस असल्याचा आरोप करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर, तथा कथित व्यक्ती व त्यांच्या साथीदारांनी सुयश मेटल कंपनीच्या मालकांच्या घरी जाऊन मोठ्या प्रमाणावर तोडफोड करून घरातील वस्तूंचे नुकसान केल्याचेही निवेदनात नमूद आहे. यासंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज व छायाचित्रे पुराव्यासह प्रशासनाकडे देण्यात आली आहेत.या गंभीर प्रकरणाची दखल घेत अशा व्यक्ती व साथीदारांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच औद्योगिक वसाहतीतील दहशत कायमस्वरूपी दूर करण्यासाठी स्थानिक पोलिसांना त्वरित कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी आमी संघटनेतर्फे करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे म्हणाले की, ''कोणाकडूनही दबाव, धमकी, खंडणी किंवा दहशतीचा प्रकार होत असल्यास उद्योजकांनी घाबरून न जाता तातडीने स्वतःहून तक्रार दाखल करावी. पोलिस प्रशासन पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे आश्वासन दिले.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कारवाईचे आश्वासन

या प्रकरणासंदर्भात अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उद्योजकांना आश्वासन देत स्पष्ट केले की, ''औद्योगिक वसाहतीत दहशत निर्माण करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल. भविष्यात अशा प्रकारचा दबाव, धमकी किंवा दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना तात्काळ धडा शिकवला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पाल्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे गरजेचे – उपमहापौर

डॉ. लक्ष्मीकांत पारगावकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेच्या मुख्याधापिका संगीता गांगर्डे, शिक्षिका अर्चना चव्हाण, रुपाली जोशी, अनिता गायकवाड, सीमा सोनावणे, पूर्वा भिंगारदिवे, पूजा शिरसाठ, लीना काळे, नीलम पवार पालक प्रतिनिधी विशाल गव्हाणे, सचिन मुसाळे, इंद्रजित चव्हाण, ऋषिकेश वायकर, अमोल गांधले, ईश्वर गांगर्डे, शिवाजी कोलते, शिवाजी हजारे, रोहिदास पवार, निलेश नजन, भरत बनकर महिला मध्ये वाजे मॅडम, कदम भारती, स्नेहल येणारे, अनिता कजबे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमांस मोठया प्रमाणात पालक व बोल्हेगाव परिसरातील नागरिक उपस्थित होते.